MMRC

Colaba-Bandra-SEEPZ Metro III Corridor

# मु.मे.रे.कॉ.ने मेट्रो ३ चे डब्बे बनवण्याचे कंत्राटदार केले नक्की

'मेक इन इंडिया' अंतर्गत सर्व २४८ डब्ब्याची निर्मिती होणार भारतात

**मुंबई, १९ जुलै, २०१८:** मु.मे.रे.कॉ. ने आज मेट्रो 3 चे डब्बे बनवण्याचे कंत्राट निविदा प्रक्रियेनुसार "ऑलस्तोम ट्रान्सपोर्ट इंडिया लि. आणि ऑलस्तोम ट्रान्सपोर्ट एस.ए. फ्रांस संयुक्त" यांना दिले. मुंबईच्या नागरिकांना कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो 3 सेवेसाठी उत्कृष्ट दर्जाचे डब्बे देण्यासाठी मु.मे.रे.कॉ. ने ही निविदा प्रक्रिया विषेश काळजीपुर्वक हाताळली. यानुसार पूर्वपात्र झालेल्या कंत्राटदारांमधून "ऑलस्तोम ट्रान्सपोर्ट इंडिया लि. आणि ऑलस्तोम ट्रान्सपोर्ट एस.ए. फ्रांस संयुक्त"ची निवड झाली. खरेदी प्रक्रियेच्या कायदेशीर नियम-अटींची योग्य प्रकारे पूर्तता करून "जायका"ची मान्यता मिळाल्यानंतर हे कंत्राट देण्यात आलं.

डिझाईन, निर्मिती, पुरवठा , मांडणी , चाचणी आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष सुरुवात या कामांचा कंत्राटात समावेश असून ८ डब्यांच्या ३१ ट्रेन ( रुंदी ३.२ मी ) अशी रचना आहे . १८० मी लांबी असलेल्या डब्याची क्षमता ३०० प्रवासी प्रति डब्बा आणि पूर्ण ट्रेनची एकूण क्षमता २३५० प्रवाश्यांची आहे (६ प्रवासी प्रति चौ. मी.). आरामदायी आसनव्यवस्था ही या डब्याची खासियत आहे. ट्रेन २५ केव्ही एसी ट्रॅक्शन विद्युत पुरवठ्यावर कार्यरत होणार आहे . प्रत्येक बाजूला ४ दरवाजे अशी व्यवस्था असून डब्बे स्टेनलेस स्टील धातूचे आहेत.

मेट्रो 3 च्या डब्यांची ठळक वैशिष्ट्ये:

- एलईडी प्रकाश योजना
- 35 वर्ष इतका कालावधी ट्रेन बिनतक्रार कार्यरत
- *उत्तम वेग नियंत्रण, वीज बचत यासाठी ७५% मोटराइझेशन
- *वातानुकूल नियंत्रण
- *प्रशस्त एलइडी स्क्रीनवर खास प्रवाशांसाठी दरवाज्याच्या कार्यप्रणालीचे प्रदर्शन
- प्रवाशांच्या माहितीसाठी डिजिटल मार्ग नकाशा
- *मदत केंद्र

कंत्राट निश्चितीच्या निमित्ताने बोलताना मु.मे.रे.कॉ. चे प्रवक्ते म्हणाले, " प्रकल्पाच्या दृष्टीने हा एक महत्वाचा टप्पा आहे . अधिकाधिक प्रवासी आणि त्यानुसार ट्रेनची संख्या हे आव्हान आहे . त्यासाठी उत्तम दर्जाचे आणि प्रवाशांच्या दृष्टीने सुरक्षित डब्बे ही महत्वाची बाब आहे. त्यासाठी कम्युनिकेशन आधारित ट्रेन नियंत्रण प्रणाली आणि विना चालक ट्रेन पद्धती ही योजना आहे. मु.मे.रे. कॉ.ने केंद्र शासन आणि राज्य सरकार यांचे सातत्याने मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार मानले ."

**For media queries, please contact**
**Saroj Gupta**
8291846169
Saroj.gupta@bm.com